MHLA150008562024

दाखल दिनांक – २९/०७/२०२४
नोंदणी दिनांक – ३१/०७/२०२४
निकाल दिनांक– २०/०६/२०२६
कालावधी– ०१ वर्ष १० महिने २० दिवस

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.२ चाकूर यांचे न्यायालयात**
**(पिठासिन अधिकारी दिव्या सा. करभाजन)**

**फौजदारी किरकोळ अर्ज ४१/२०२४**

**नि.क्र.१०**

| | | |
|---|---|---|
| **अर्जदार** | १. | दिपाली भ्र. हिराकांत गायकवाड,<br>वय– २८, व्यवसाय– घरकाम, |
| | २. | आरोही हिराकांत गायकवाड,<br>वय– ०९, व्यवसाय– शिक्षण, |
| | ३. | आयोध्या हिराकांत गायकवाड,<br>वय– ०५, व्यवसाय– शिक्षण,<br>अर्जदार क्र. २ व ३ अ.पा.क. अर्जदार क्र. १ दिपाली,<br>वरील सर्व रा. हरी जवळगा ता. निलंगा जि. लातूर<br>हा.मु. आदर्श कॉलनी चाकूर ता. चाकूर जि. लातूर |
| **अर्जदारतर्फे** | | श्री. एन.आर. केराळे |
| **गैरअर्जदार** | | हिराकांत भिमराव गायकवाड,<br>वय– ३५ वर्षे, धंदा– खाजगी नोकरी व शेती,<br>रा. हरी जवळगा ता. निलंगा जि. लातूर |
| **गैरअर्जदारा तर्फे वकिल** | | कोणीही नाही. |

| | | |
|---|---|---|
| अर्जास कारण | | दि.०५/०१/२०२४ |

| | | |
|---|---|---|
| अर्ज दाखल तारिख | | २९/०७/२०२४ |
| साक्षीपुरावा सुरु झालेचा दिनांक | | २४/०७/२०२५ |
| अर्जदार तर्फे युक्तिवाद दिनांक | | १७/०३/२०२६ |
| जाबदार तर्फे युक्तिवाद दिनांक | | युक्तिवाद नाही असा आदेश पारितः १७/०३/२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | | २०/०६/२०२६ |

## अर्जदार तर्फे घेतलेल्या साक्षीदारांची यादी

| अ.क्र. | साक्षीदाराचे नांव | निशाणी क्रमांक | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | दिपाली हिराकांत गायकवाड | ०८ | अर्जदार |
| अ.सा.क्र.२ | सौदागर गिरजाप्पा जोगदंड | ०९ | अर्जदाराचे वडील |

## अर्जदार तर्फे सिध्द केलेले दस्तऐवज

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| | -- | -- |

## न्या य नि र्ण य

## (घोषित दिनांक २०/०६/२०२६.)

### अर्जदाराची हकिकत थोडक्यात खालीलप्रमाणे –

अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार यांचा विवाह दिनांक १३/०८/२०१५ रोजी हिंदू रिती–रिवाजाप्रमाणे मौजे–कासार शिरसी ता. निलंगा जि. लातूर येथे जाती–रुढी रिवाजानुसार संपन्न झाला आहे. अर्जदार क्र. १ हिस गैरअर्जदारापासून अर्जदार क्र. २ व ३ असे अपत्य आहेत. अर्जदार क्र. १

व गैरअर्जदार यांचे पती–पत्नीत्वाचे नाते अद्याप पर्यंत कायम आहे.

२. अर्जदार क्र. १ हिस सन–२०१८ पर्यंत गैरअर्जदार व त्यांच्या नातोवाईकांनी चांगले नांदवले. मात्र तेथून पुढे गैरअर्जदार क्र. १ व त्यांच्या आई–वडील यांनी कर्ज सारण्यासाठी माहेरहून पाच लाख रुपये घेऊन ये, म्हणुन अर्जदार क्र. १ हिस सतत त्रास देऊ लागले. मात्र अर्जदार क्र. १ ही त्रास सहन करत तशीच नांदत राहीली. अशा परिस्थितीत सन–२०१९ साली अर्जदार क्र. १ हिस दुसरी मुलगी अर्जदार क्र. ३ ही झाली. अर्जदार क्र. १ चे वडील सन–२०१८ मध्ये रिटायर झाल्यामुळे त्यांच्याकडे खुप पेन्शनचा पैसा आलेला आहे. तर त्यांच्याकडून पैसे घेऊन ये, म्हणुन जास्तीचा त्रास गैरअर्जदार व त्यांच्या आई–वडीलांनी सुरु केला. अर्जदार क्र. १ वर गैरअर्जदार क्र. १ हा चारित्र्याचा संशय घेऊ लागला. तसेच गैरअर्जदार क्र. १ ला त्यांचा भाऊ चंद्रकांत गायकवाड हा पण त्रास देण्यासाठी मदत करु लागला. पैसे मागणीचा त्रास अर्जदार क्र. १ हिने आपल्या आई–वडीलांना व इतर नातलगांना सांगितला. म्हणुन अर्जदार क्र. १ चे आई–वडील व इतर नातेवाईकांनी गैरअर्जदार व त्यांच्या नातलगांना अनेकदा समजावून सांगितले. परंतू त्रास कमी झाली नाही.

३. गैरअर्जदार व त्यांचे नातलग अर्जदार क्र. १ हिस पैसे आणण्याविषयी सतत त्रास करत राहिले तसेच चारित्र्यावर संशय घेत होते. तुला दुसरी मुलगी कशी झाली, मुलगा का झाला नाही असे म्हणुन त्रास वाढवला. त्यातच गैरअर्जदार क्र. १ यांनी अर्जदार क्र. १ ते ३ यांना चाकूर येथे आणले व अर्जदार क्र. १ च्या वडीलांस सांगितले की, दोन महिने अर्जदारास येथे ठेऊन घ्या. त्यांनतर मी त्यांना पुणे येथे घेऊन जातो. मात्र त्यानंतर गैरअर्जदाराने अर्जदारास घेऊन गेला नाही व अर्जदार क्र. १ व त्यांच्या नातलगाने अनेक वेळेस फोन करुन गैरअर्जदारास येण्याविषयी व अर्जदारास घेऊन जाण्याविषयी विनंती केली. परंतू गैरअर्जदाराने पाच लाख रुपये दिल्याशिवाय अर्जदार क्र. १ हिस नांदवणार नाही, असे स्पष्टपणे सांगितले. त्यानंतर अर्जदार क्र. १ हिने सन–२०२३ मध्ये गैरअर्जदार व त्यांचे आई–वडील व त्यांच्या भावावर भा.द.वि. ४९८ (अ) नुसार गुन्हा क्र. ३३८/२०२३ असून सदरची केस न्यायप्रविष्ठ आहे.

४. भा.द.वि. ४९८ (अ) चे दोषारोप पत्र दाखल झालेले पाहण्यासाठी स्वतः गैरअर्जदार चाकूर न्यायालयात दि. २१/१२/२०२३ रोजी आला त्यांच्या सोबत त्यांच्या गावचे अशोक विश्वांभर त्रिकणे व रमेश पांडूरंग खोकले हे आले होते. त्या सर्वांनी अर्जदार क्र. १ व तिच्या वडीलांस चाकूर न्यायालयात बोलवून घेतले व नांदावयास घेऊन जातो असा १००/– रुपयाच्या बाँड पेपरवर लिहून देऊन दि. ०५/०१/२०२४ पर्यंत नांदावयास घेऊन जातो असे लिहून दिले. मग त्यानंतर गैरअर्जदार हा नांदावयास घेऊन जाण्यासाठी परत आला नाही. तसेच अर्जदार क्र. १ हिने अनेक वेळेस फोन केल्यानंतर त्याने फोन पण उचलला नाही.

५. गैरअर्जदार यांनी अर्जदार क्र. १ ते ३ यांना सांभाळण्यास निष्काळजीपणा दाखवला आहे. तसेच अर्जदार क्र. १ ते ३ यांचे आई–वडील अत्यंत गरीब असून त्यांच्याकडे कोणतेही जंगम मालमत्ता नाही. अर्जदार क्र. २ व ३ हे शिक्षण घेत आहेत. त्यांच्या शिक्षणाचा खर्च ही अर्जदार क्र. १ ही करते अर्जदार क्र. १ कडे कसलेही उत्पन्नाचे साधन नाही. ती स्वतः चे पोट स्वतः काम करुन भरु शकत नाही. यालट गैरअर्जदाराकडे उत्पन्नाचे साधन आहे.

६. गैरअर्जदाराकडे मौजे–उस्तुरी ता. निलंगा जि. लातूर येथे वडीलांच्या नावे जवळपास सहा एकर तीस गुंठे एवढी शेतजमीन बागायती आहे. गैरअर्जदार व त्यांचे आई–वडील व त्यांचा भाऊ हा एकत्रपणे राहतात. शेतामध्ये दोन बोअरवेल्स व एक विहीर असून वार्षिक उत्पन्न तीस लाख रुपये हे होते. अर्जदार क्र. १ हिस महिना १५,०००/– रुपये व अर्जदार क्र. २ व ३ यांना प्रत्येकी महिना १०,०००/– रुपये पोटगी मंजूर करण्यात यावी. अर्जासोबत सदरील जमीनीचा ७/१२ उतारा दाखल केलेला आहे.

७. गैरअर्जदार हा पुणे येथे कंपनीत खाजगी नौकरी करतो व त्यास महिना ३०,०००/– रुपये पगार मिळतो. अशाप्रकारे गैरअर्जदाराचे वार्षिक उत्पन्न शेतीपासूनचे ३०,०००/– रुपये व पगार ३६,०००/– रुपये एकूण ३०,३६,०००/– रुपये उत्पन्न आहे. सध्याची महागाई, अर्जदाराचे राहणीमान व अर्जदार क्र. २ व ३ चे शिक्षणाचा खर्च याचा विचार करता अर्जदार क्र. १ हिस महिना १५,०००/– रुपये व अर्जदार क्र. २ व ३ यांना महिना प्रत्येकी

१०,०००/– रुपये पोटगी गैरअर्जदाराकडून मिळण्याची विनंती केली. गैरअर्जदाराकडे उत्पन्नाचे खुप मोठे साधन असल्यामुळे तो अर्जदारांना स्वतंत्र पोटगी देण्याची ऐपत बाळगुन आहे. त्यामुळे अर्जदार क्र. १ ते ३ चा अर्ज मंजूर करुन अर्जदार क्र. १ हिस प्रतिमहिना १५,०००/– रुपये व अर्जदार क्र. २ व ३ यांना प्रतिमहिना १०,०००/–रुपये पोटगी अर्ज दाखल केलेल्या तारखेपासून मंजूर करण्याची विनंती केली.

८. या प्रकरणात गैरअर्जदार यांनी संधी मिळूनही त्यांचे म्हणणे दाखल केले नाही, त्यामुळे नि.क्र. १ वर दि.२५.०६.२०२५ रोजी आदेश पारीत करुन त्यांच्या विरुध्द विना म्हणणे अर्ज पुढे चालविण्यात आला.

९. अर्जदाराचे कथनाप्रमाणे खालील मुद्दे निर्णयासाठी आढळुन आले व मी त्यावर माझे निष्कर्ष नोंदविले असून त्यावर तिची कारणे नमुद केले आहे.

| <u>अ.क्रं.</u> | <u>मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १. | गैरअर्जदाराने अर्जदार क्र. १ हिचा कौटुंबिक हिंसाचार केला असल्याचे अर्जदार शाबीत करते काय ? | **...होकारार्थी** |
| २. | अर्जदार हि स्वतःची उपजिवीका करण्यास असमर्थ असल्याचे शाबीत करते काय ? | **...होकारार्थी** |
| ३. | गैरअर्जदाराकडे अर्जदारांना पोटगी देण्याइतपत उत्पन्नाचे साधन आहे काय ? | **...होकारार्थी** |
| ४. | कोणता आदेश व हुकुमनामा ? | **...अंतिम आदेशानुसार** |

## कारणमीमांसा

१०. या अर्जापुष्ठ्यर्थ अर्जदाराने स्वतःचे शपथपत्र निशाणी ०८ वर

दाखल केले आहे. तसेच अर्जदारातर्फे साक्षीदार क्र. २ यांच्या पुराव्याचे शपथपत्र नि.क्र. ०९ नुसार दाखल केले आहे. अर्जदाराने तिचे नि.क्र. ९/२ वर मालमत्ता व दायित्व याचे शपथपत्र् दाखल केले आहे. निशाणी ९/१ वरील पुरसीसनुसार अर्जदाराने तोंडी पुरावा बंद केला आहे. गैरअर्जदार या प्रकरणात हजर न झाल्याने गैरअर्जदारातर्फे कागदोपत्री अथवा तोंडी पुरावा दाखल केलेला नाही. अर्जदारातर्फे विधीज्ञ यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला.

**मुद्दा क्र. १ ते ३ करीता –**

११. मुद्दा क्र. १ ते ३ हे एकमेकांशी निगडीत असल्याचे त्यांचे विवेचन एकत्रात केले आहे. अर्जदार क्र. १ ने तिचे अर्जाप्रमाणेच तिचे पुराव्याचे शपथपत्र (निशाणी ८) मध्ये कथन केलेले आहे. तसेच अर्जदार क्र. १ यांच्यातर्फे साक्षीदार क्र. २ यांच्या पुराव्याचे शपथपत्र नि.क्र. ९ नुसार दाखल आहे. अर्जदारांची मुळ अर्जातील कथने या आदेशाच्या सुरुवातीसच सविस्तरपणे नमुद केलेली आहेत. गैरअर्जदाराने उलटतपास न घेतल्यामुळे अर्जदाराचा पुरावा खोडून काढण्यात आलेला नाही. अर्जदार व साक्षीदार यांच्या पुराव्यावरुन, अर्जदार क्र. १ चा विवाह गैरअर्जदार यांच्या सोबत झाल्याचे, ती तेव्हापासून गैरअर्जदारासोबत सासरी नांदत असल्याचे, गैरअर्जदाराकडुन तिला दिवस जावून अर्जदार क्र. २ व ३ यांचा जन्म झाल्याचे, गैरअर्जदार हा वेळोवेळी अर्जदारांवर पैशांच्या मागणीकरीता व चारित्र्यावर संशय घेवून शारिरीक व मानसिक छळ करीत असल्याचे, गैरअर्जदाराने अर्जदारांची कुठल्याही प्रकारे विचारपुस केली नाही अगर औषधपाण्याची व्यवस्था केली नसल्याचे, अर्जदार क्र. १ कडे तिचे वडीलांकडुन पैसे आणण्याची मागणी करीत असल्याचे दिसून येते.

१२. संपुर्ण अर्जाचे अवलोकन केले असता ही बाब नाकारता येत नाही की, प्रस्तुत अर्जामध्ये अर्जदार हिने नेमक्या कोणत्या तारखांना गैरअर्जदार यांनी तिचा कौटुंबिक छळ केला आहे हे नमुद केलेले नाही. परंतु नवीन लग्न झालेल्या एका स्त्रीकडुन ही गोष्ट अपेक्षीत नसते की तिने छळ झालेल्या तारखा नमुद करुन

ठेवाव्यात. अर्जात नमुद केलेल्या सर्व घटनांचे अवलोकन केले असता, त्या घटना एखाद्या व्यक्तीला मानसिक व शारीरिक वेदना देणाऱ्या आहेत, ही बाब नाकारता येणार नाही. प्रस्तुतच्या घटना ह्या खऱ्या नसुन खोटया होत्या हे गैरअर्जदाराने अभिलेखावर आणणे हा पुराव्याचा भाग होता. परंतु गैरअर्जदार यांनी उलटतपास न घेतल्यामुळे अर्जदाराचा पुरावा खोडुन काढण्यात आलेला नाही. अर्जदाराच्या या पुराव्यास उलटतपास नाही. गैरअर्जदाराने स्वतःस तपासले नाही. अशा प्रकारे गैरअर्जदराने अर्जदाराच्या पुराव्यास कोणत्याही प्रकारे आव्हान दिलेले नाही.

१३. अर्जदारने गैरअर्जदार विरोधात सन २०२३ मध्ये गुन्हा क्र. ३३८/२०२३ हे मारहाणी बाबत तक्रार दाखल केली आहे असे शपथेवर सांगितले आहे. गैरअर्जदाराने उलटतपास न घेतल्यामुळे सदरचा पुरावा खोडून काढण्यात आलेला नाही. अर्जदार क्र.१ च्या या पुराव्यावरुन उभयपक्षकारांमध्ये कौटुंबिक नातेसंबंध (Domestic Relationship) होते व गैरअर्जदाराने तिच्यावर वेळोवेळी घरगुती हिंसाचार केला या बाबी अर्जदाराने शाबीत केलेल्या आहेत असे मला वाटते.

१४. याठिकाणी अर्जदारांनी कोणकोणत्या मागण्या केल्या आहेत हे पाहणे आवश्यक आहे. अर्जदार क्र. १ यांनी गैरअर्जदाराकडुन अर्जदार क्र. १ यांना दरमहा रुपये १५,०००/-, अर्जदार क्र. २ व ३ यांना प्रत्येकी रु.१०,०००/- पोटगी मिळण्याची मागणी केली आहे. ही मागणी मिळण्यासाठी अर्जदार नं.१ वर गैरअर्जदाराने घरगुती हिंसाचार केल्याचे व अर्जदार यांचे पालण पोषण करण्यास दुर्लक्ष केल्याचे अर्जदारांनी शाबीत करणे आवश्यक होते. वरील विवेचनावरुन अर्जदार नं. १ वर गैरअर्जदाराने घरगुती हिंसाचार करुन अर्जदारा यांच्या पालण पोषणाकडे दुर्लक्ष केल्याचे शाबीत झाले आहे.

१५. अर्जदार नं. १ वर गैरअर्जदाराने घरगुती हिंसाचार करुन पालण पोषणासाठी दुर्लक्ष केल्याचे प्रथमदर्शनी शाबीत झाले असल्यामुळे व उभयपक्षांमधील नातेसंबंध मान्य असल्यामुळे अर्जदार पोटगी मिळण्यास अर्जदार

नं. १ हि पत्नी म्हणून तर अर्जदार नं. २ व ३ हे या मुली म्हणून पात्र आहेत. त्याचप्रमाणे, अर्जदारांवर घरगुती हिंसाचार झाल्याचे प्रथमदर्शनी शाबीत झाले आहे. मासिक पोटगीची नेमकी रक्कम ठरविण्यासाठी उभयपक्षकारांचे एकुण उत्पन्न, उत्पन्नाची साधने व त्यांचे राहणीमान याबाबत आलेला पुरावा पाहणे आवश्यक आहे.

१६. अर्जदाराने तिच्या शपथपत्रात गैरअहर्जदार हे खाजगी नोकरी करीत असल्याचे व त्यांच्याकडे शेतीतून उत्पन्न मिळत असल्यामुळे त्यांची अर्थिक परिस्थीती व उत्पन्न चांगले आहे. गैरअर्जदारावर अर्जदार यांचेशिवाय इतर कोणीही अवलंबून नाही. परंतु, अर्जदाराने गैरअर्जदार हे खाजगी नोकरी करतात व त्यापासून त्यास दरमहा रुपये ३०,०००/- उत्पन्न मिळत असल्याबाबत कुठलाही कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. म्हणून गैरअर्जदारास एकूण मिळणा-या उत्पन्नाबाबत संभ्रम राहतो. अर्जदाराने गैरअर्जदाराचे उत्पन्न सिध्द करण्यासाठी ७/१२ उतारा दाखल केला आहे, परंतू सदर ७/१२ वर गैरअर्जदाराच्या वडीलांचे नांव दिसून येते. सदरची शेती ही गैरअर्जदाराच्या वडीलांच्या नावे असल्याचे दिसून येते.

१७. गैरअर्जदाराचे उत्पन्न दाखवण्यासाठी अर्जदार नं. १ ची शपथेवरील कथने व दाखल केलेली कागदपत्रे पुरेशी नाहीत. गैरअर्जदार यांचे राहणीमान चांगले आहे व आर्थिक परिस्थिती चांगली असल्याचे दाखवण्यासाठी ती इतर तोंडी अगर कागदोपत्री पुरावे दाखल करु शकली असती किंबहूना ते दाखल करणे आवश्यक होते. असा कोणताही पुरावा अभिलेखावर नसताना अर्जदार म्हणते त्याप्रमाणे गैरअर्जदाराची आर्थिक परिस्थिती आहे असा प्रथमदर्शनी निष्कर्ष देखील काढता येणार नाही. अशा प्रकारे गैरअर्जदाराचे उत्पन्नाचे मार्ग तथा उत्पन्न दाखविण्यासाठी ठोस असा पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. पण वर चर्चिल्याप्रमाणे उभयपक्षकारांमधील संबंध विचारात घेता, अर्जदारांचा सांभाळ करण्याचे तथा त्यांचा उदरनिर्वाह, औषधपाणी तथा कपडेलत्ते याबाबत व्यवस्था

व तरतूद करण्याची जबाबदारी पती व पिता या नात्याने जाबदारची आहे.

१८. अर्ज दाखल करतेवेळी गैरअर्जदाराचे वय ३५ वर्षे असल्याचे नमुद केले आहे. त्याला एखादा असाध्य आजार आहे अगर तो मानसिक अगर शारिरीक दृष्टया अपंग/दुर्बल आहे, असा त्याचा बचाव नाही. त्याचे वय व त्याला कोणत्याही प्रकारचा आजार नाही या बाबी विचारात घेता त्याने किमान मजूरी केली तरी प्रचलित मजूरीच्या दराप्रमाणे तो दर दिवसाला रुपये ५००/- ते ७००/- म्हणजेच दरमहा रुपये १५०००/- ते २१०००/- उत्पन्न मिळवित असेल असा अन्वयार्थ काढता येईल. अशा परिस्थितीत वर चर्चिल्याप्रमाणे त्याचे उत्पन्न व अर्जदारांना त्याची सांभाळावयाची जबाबदारी विचारात घेता त्याला अर्जदारांना पोटगी देण्याइतपक उत्पन्न आहे असा निष्कर्ष काढता येईल.

१९. अर्जदार क्र. १ करीता रु.१५,०००/-, अर्जदार क्र. २ व ३ यांना प्रत्येकी १०,०००/- दरमहा पोटगीची मागणी केली आहे. परंतु, गैरअर्जदारचे दरमहा उत्पन्न पहाता हि मागणी अवाजवी ठरते. अर्जदार क्र. २ व ३ हे अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार यांचे मुली असल्यामुळे त्यांच्या पालनपोषणाची जबाबदारी संयुक्तपणे गैरअर्जदार व अर्जदार क्र.१ यांची आहे. त्यामुळे उभयबाजूंच्या राहणीमानाचा साकल्याने विचार करता अर्जदार क्र. १ यांना दरमहा रुपये ६,०००/- व अर्जदार क्र. २ व ३ यांना प्रत्येकी दरमहा रु.३,००० /- पोटगी स्वरुपात देण्याचा आदेश करणे रास्त व न्याय राहिल. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ ते ३ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवला असून मुद्दा क्रमांक ४ करता खालील आदेश पारीत करणेत येत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | अर्जदाराचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो. |
| २. | गैरअर्जदाराने अर्ज दाखल तारखेपासून अर्जदार क्र. १ यांना दरमहा रुपये ६,०००/-(रुपये सहा हजार मात्र) व अर्जदार क्र. २ व ३ यांना प्रत्येकी, दरमहा रु.३,०००/-(रुपये तीन हजार मात्र) म्हणजे **एकूण रु.** |

| | |
|---|---|
| | **१२,०००/-**(रुपये बारा हजार मात्र) पोटगी अर्ज दाखल तारखेपासून द्यावी. |
| ३. | गैरअर्जदार यांनी प्रत्येक महिन्याच्या १० तारखेआधी पोटगीची रक्कम अर्जदार क्र. १ ते ३ यांना अदा करावी. |
| ४. | गैरअर्जदाराने अर्जदार यांना, या अर्जाचा खर्च रुपये १,०००/-(रुपये एक हजार मात्र) या निकाल तारखेपासून तीन महिन्याच्या आत दयावा. |
| ५. | या आदेशाची प्रत्येकी एक प्रत उभयपक्षकारांना विनामुल्य दयावी. **(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात देण्यात व घोषीत करण्यात आला.)** |

DIVYA

Digitally signed by DIVYA
Date: 2026.06.20 15:55:03 +0530

**चाकूर** **(दिव्या सा. करभाजन)**

**दिनांक : २०/०६/२०२६.** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,**

**न्यायालय क्र.२, चाकूर**

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file judgment/order are same, word to word, as per the original judgment/order;

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : M.B. Pathan |
| Court Name | : Jt. C.J.J.D. and J.M.F.C., Chakur. |
| Date of judgment/order | : 20/06/2026 |
| Date of Judgment/Order signed by the Presiding Officer on | : 20/06/2026 |
| Judgment/Order uploaded on | : 20/06/2026 |